

# श्रीअरविंद आश्रम

# अभीप्सा

अखिल भारतीय पत्रिका

ऑगस्ट २०२६

वर्ष ५१ अंक ०८



श्रीमाताजी आणि श्रीअरविंद

# अभीप्सा

(ईश्वराप्रति असलेली आस)

**प्रकृती ती जड । करील उघड । ईश्वरी ते रूप । सुघटित ।।**

---


**प्रकाशक**

श्री. प्रदीप नारंग, पुडुचेरी

**प्रकाशन स्थळ**

श्रीअरविंद सोसायटी

सोसायटी हाऊस, ११ सेंट मार्टिन स्ट्रीट, पुडुचेरी – ६०५००१



**संपादक**

डॉ. केतकी मोडक, पुणे

भ्रमणध्वनी : ९४२१०१६०८९

ई–मेल : editorabhipsa2018@gmail.com



**मुद्रक**

सेन्थिल ऑण्डवर प्रेस, पुडुचेरी – ६०५००१


**आश्रमीय जीवन जगू इच्छिणाऱ्यांसाठी दिलेला संदेश**

श्रीमाताजींचे तुमच्याकडे लक्ष आहे हे लक्षात ठेवून
तुम्ही आचरण केले पाहिजे;
कारण
त्या खरोखरच नेहमी उपस्थित असतात.

– श्रीअरविंद (CWSA 32 : 169)

*

## श्रीअरविंद-आश्रम


संपादकीय..............................................................०२
एक दिव्य स्वप्न........................................................०३
आश्रमाची स्थापना....................................................०८
आश्रमाचे स्वरूप.......................................................१२
आश्रमाचे कार्य.........................................................१४
आश्रमातील दर्शनदिन................................................१७
आश्रमाच्या उंबरठ्यावर...............................................२५
आश्रमीय जीवन........................................................३०
श्रीअरविंद लिखित प्राज्ञवचन आणि त्याचा मथितार्थ.................३५


---

## संपादकीय

२०२६ साल हे दोन महत्त्वपूर्ण गोष्टींचे शताब्दी वर्ष आहे. या दोन्ही शताब्दी २४ नोव्हेंबर या दिवसाशी संबंधित आहेत.

या दिवशी, श्रीअरविंदांच्या शारीर-चेतनेमध्ये श्रीकृष्णाचे अवतरण झाले आणि त्याबरोबर त्यांची वैयक्तिक साधना पूर्णत्वास गेली. येथून अतिमानसिक आविष्करणाचा मार्ग खुला झाला. याच दिवशी श्रीअरविंद-आश्रमाची स्थापना झाली आणि मनुष्याच्या भावी उच्चतर उत्क्रांतीच्या आध्यात्मिक प्रयोगशाळेचे बीजारोपण झाले. 'अभीप्सा' मासिकाचा ऑगस्ट महिन्याचा अंक 'श्रीअरविंद-आश्रम' या विषयाला वाहिलेला आहे.

संपादक, अभीप्सा मासिक

**

योगी श्रीअरविंद म्हणजे पूर्वाश्रमीचे क्रांतिकारक अरविंद घोष आणि श्रीमाताजी म्हणजे पूर्वाश्रमीच्या मीरा अल्फासा, (फ्रान्स). 'श्रीअरविंद-आश्रम' हा भारताच्या पूर्व किनाऱ्यावर पाँडिचेरी येथे आहे.

# एक दिव्य स्वप्न

## श्रीअरविंद-आश्रमाच्या निर्मितीमागील संकल्पना

या पृथ्वीवर असे एक स्थान असावे की, ज्यावर कोणतेच राष्ट्र स्वत:चा मालकी हक्क गाजवणार नाही.

जिथे प्रामाणिक अभीप्सा (aspiration) बाळगणारी, शुभसंकल्प असणारी सर्व माणसं, जगाचे नागरिक म्हणून मुक्त मनाने जीवन जगू शकतील. ते केवळ एकाचीच, म्हणजेच त्या परम सत्याचीच आज्ञा पाळतील.

शांती, सलोखा, सुमेळ यांनी युक्त असे हे स्थान असेल. येथे, मनुष्यामधील संघर्षभावनेच्या सर्व प्रेरणा या मनुष्याच्या दु:खभोग व चिंता यांच्या मूळकारणांवर विजय मिळविण्यासाठीच उपयोगात आणल्या जातील. त्या प्रेरणा व्यक्तीच्या दुर्बलतेवर आणि अज्ञानावर मात करण्यासाठी उपयोगात आणल्या जातील. व्यक्तीच्या मर्यादा व अक्षमता यांना उल्लंघून जाण्यासाठी त्या प्रेरणा उपयोगात आणल्या जातील.

हे असे स्थान असेल की, जेथे इच्छावासनांच्या उपभोगापेक्षा आणि भौतिक सुखसुविधा, मौजमजा यांच्या मागे धावण्यापेक्षा, प्रगतीची तळमळ व आत्म्याची गरज या गोष्टींना प्राधान्य दिले जाईल.

येथे स्वत:च्या आत्म्याशी फारकत न होता, लहान मुलं समग्रपणे, सर्वांगीणरित्या मोठी होतील, विकसित होतील. शिक्षण हे फक्त परीक्षेत उत्तीर्ण होणे, पद वा पदवी मिळविणे यांसाठी नव्हे तर, विद्यार्थ्यांमध्ये अंगभूत असलेल्या क्षमतांच्या विकसनासाठी तसेच सुप्त असलेल्या नवनवीन क्षमतांच्या प्रकटीकरणासाठी दिले जाईल.

येथे पद, नावलौकिक, प्रतिष्ठा यांची जागा सेवा करण्याची, सुव्यवस्था लावण्याची संधी या गोष्टी घेतील.

प्रत्येकाच्या शारीर-गरजा समदृष्टीने पूर्ण केल्या जातील. एखादी व्यक्ती बौद्धिक, नैतिक, आध्यात्मिकदृष्ट्या श्रेष्ठ असेल तर, या संरचनेमध्ये

त्या व्यक्तीचे श्रेष्ठत्व हे जीवनातील वाढती सुखसमृद्धी व सत्ता यांद्वारे व्यक्त होणार नाही तर, त्या व्यक्तीवर अधिक जबाबदाऱ्या सोपवल्या जातील आणि त्याद्वारे तिचे श्रेष्ठत्व व्यक्त होईल.

चित्रकला, शिल्पकला, संगीत, साहित्य इत्यादी कलांच्या विविध रूपांमधून व्यक्त होणारे सौंदर्य सर्वांना सारख्याच प्रमाणात उपलब्ध असेल. त्यामधून मिळणाऱ्या आनंदाचा आस्वाद घेण्याची क्षमता ही त्या व्यक्तीच्या सामाजिक वा आर्थिक स्थितीवर अवलंबून असणार नाही तर, ती प्रत्येक व्यक्तीच्या क्षमतांवर आधारित असेल.

कारण या आदर्श नगरीमध्ये, पैसा सर्वसत्ताधीश नसेल; भौतिक संपत्ती आणि समाजातील व्यक्तीचे स्थान यांपेक्षा तिच्या गुणवत्तेला अधिक महत्त्व असेल.

येथे कर्म हे व्यक्तीच्या उपजीविकेचे साधन नसेल तर, स्वत:ला अभिव्यक्त करण्याचा तो मार्ग असेल. समाजासाठी सेवा करत असताना, कर्म हा स्वतःच्या क्षमता व शक्यता विकसित करण्याचा मार्ग असेल, परिणामत: ते कर्म व्यक्तीचे कार्यक्षेत्र असेल. त्या अनुषंगाने त्यातून तिचा उदरनिर्वाहही होईल.

सर्वसाधारणपणे मानवी नातेसंबंध हे स्पर्धा आणि संघर्षांवर आधारित असतात. पण हे असे एक स्थान असेल की जेथे त्यांची जागा खराखुरा बंधुभाव, सहकार्य, काही चांगले करण्याची, त्याचे अनुसरण करण्याची तळमळ असणाऱ्या नातेसंबंधांनी घेतली जाईल.

हा आदर्श वास्तवात उतरविण्यासाठी अजूनपर्यंत नक्कीच पृथ्वीची तयारी झालेली नाही; हे स्वप्न समजून घेण्यासाठी आणि आत्मसात करण्यासाठी आवश्यक असणारे पुरेसे ज्ञान अजूनपर्यंत मानवजातीकडे नाही; तसेच या आदर्शाची प्रत्यक्षात अंमलबजावणी करण्यासाठी अगदी अनिवार्य असणारी चेतनाशक्तीदेखील सद्यस्थितीत मानवजातीकडे नाही, म्हणूनच मी याला 'स्वप्न' असे म्हणते.

आणि तरीही हे स्वप्न प्रत्यक्षात उतरण्याच्या मार्गावर आहे; त्यासाठीच आमचे 'श्रीअरविंद-आश्रमा'त प्रयत्न चालू आहेत, अगदी छोट्या प्रमाणात, आम्हाला उपलब्ध असलेल्या साधनांच्या प्रमाणात ते प्रयत्न चालू आहेत. त्याचे प्रत्यक्षीकरण अपेक्षित असलेल्या पूर्णत्वापासून अजून पुष्कळ दूर आहे, परंतु त्यामध्ये उत्तरोत्तर प्रगती होत आहे; हळूहळू आम्ही आमच्या ध्येयाच्या दिशेने प्रगत होत आहोत. आम्हाला अशी खात्री आहे की, एक ना एक दिवस, विद्यमान गोंधळलेल्या परिस्थितीतून बाहेर पडण्याचा, सत्यनिष्ठ जीवनामध्ये उदित होण्याचा एक व्यवहार्य, प्रभावशाली आणि अधिक सुसंवादपूर्ण असा मार्ग आम्ही जगासमोर ठेवू शकू.

– श्रीमाताजी (CWM 12 : 93-94)

*

## आश्रमात येणे का आवश्यक?

ईश्वर हा कोणत्याही एका विशिष्ट स्थानापुरता मर्यादित नाही तर तो सर्वत्र विद्यमान आहे आणि आंतरात्मिक संपर्क हा दूर अंतरावर राहून देखील होऊ शकतो हे निश्चितच खरे आहे. आध्यात्मिक जीवन जगायचे असेल तर किंवा पूर्णयोगाची साधना करायची असेल तर, विशेषतः प्रारंभिक टप्प्यांवर, भौतिकदृष्ट्या श्रीमाताजींच्या सान्निध्यातच असले पाहिजे किंवा प्रत्येकाने पाँडिचेरी येथेच वास्तव्य केले पाहिजे, असे नाही.

पण अर्थातच सत्याची ही केवळ एक बाजू झाली. त्याला दुसरी बाजूदेखील आहे. तसे नसते, तर श्रीमाताजींच्या येथील उपस्थितीची किंवा आश्रम असण्याची किंवा येथे कोणी येण्याची काहीच गरज नाही; असा त्यातून तार्किक निष्कर्ष निघाला असता.

### आश्रमातील वास्तव्याची आवश्यकता

प्रत्येकामध्ये जरी चैत्य पुरुष (psychic being) असला तरीही ज्यांच्यामध्ये तो पूर्णपणे विकसित झालेला आहे किंवा ज्यांच्या चेतनेमध्ये त्याची उत्तम घडण झाली आहे किंवा तो अग्रस्थानी आलेला आहे अशा

व्यक्ती फारच थोड्या असतात. बहुतांशी व्यक्तींमध्ये तो पडद्याआड झाकलेला असतो, बरेचदा तो निष्प्रभ असतो किंवा असलाच तर त्याचा प्रभाव अल्प असतो, मात्र आध्यात्मिक जीवनाला त्याचा आधार व्हावा इतका तो पुरेसा सचेत किंवा सशक्त नसतो. त्यामुळे ज्यांना या सत्याची ओढ लागली आहे त्यांनी येथे आश्रमामध्ये येणे आवश्यक आहे. येथे आल्यामुळे चैत्य पुरुषाविषयी जागृत होण्यासाठी किंवा त्याची पूर्वतयारी करण्यासाठी आवश्यक असणारा दिव्य स्पर्श ते ग्रहण करू शकतात. त्यांच्यामधील प्रभावी आंतरात्मिक संपर्काची ती सुरुवात असेल.

आणखी एका कारणासाठी अनेकांना येथील वास्तव्य आवश्यक असते. त्यांची जर तशी तयारी झालेली असेल तर, येथील थेट (ईश्वरी) प्रभावामुळे आणि सान्निध्यामुळे त्यांच्या चेतनेमध्ये चैत्य पुरुषाची जडणघडण किंवा विकास होऊ शकतो किंवा तो अग्रभागी येऊ शकतो.

**आश्रमात वारंवार येण्याची ओढ**

साधकाला जेव्हा तो संस्पर्श लाभलेला असतो किंवा त्याच्यामध्ये तो विकास झालेला असतो तेव्हा, पुरेसा सक्षम असलेला साधक बाह्य जगात परत जाऊ शकतो. दूर अंतरावर राहून देखील तो साधक, संरक्षण व मार्गदर्शन यांच्या साहाय्याने, आंतरात्मिक संपर्क टिकवून ठेवू शकतो आणि त्याचे आध्यात्मिक जीवन तो अबाधित ठेवू शकतो. आंतरात्मिक संपर्कासाठी व त्याच्या विकासासाठी बाह्य जगाचा प्रभाव तितकासा अनुकूल नसतो आणि साधक जर पुरेशी काळजी घेत नसेल किंवा लक्ष्यकेंद्री नसेल तर, काही काळानंतर विरोधी प्रभावामुळे किंवा घडामोडींमुळे, हा आंतरात्मिक संपर्क सहजपणे संपुष्टात येण्याची किंवा झाकला जाण्याची शक्यता असते. आणि मग आंतरात्मिक विकासाला विलंब लागण्याची किंवा तो कुंठित होण्याची किंवा क्षीण होण्याची शक्यता असते.

आणि याच कारणासाठी म्हणजे, हा आंतरात्मिक संपर्क पुन्हा प्राप्त करून घेण्यासाठी किंवा तो दृढ करण्यासाठी किंवा झालेल्या

विकासाचे पुनरुज्जीवन करण्यासाठी किंवा त्या विकासाला नव्याने चालना देण्यासाठी साधकाला केंद्रीय प्रभावाच्या स्थानी (आश्रमामध्ये) पुन्हा परतण्याची अनेकदा आवश्यकता जाणवते.

अशा सान्निध्याची आस लागणे ही काही प्राणिक इच्छा नसते. जेव्हा त्यामागे अहंभावात्मक आग्रह असतो किंवा त्यामध्ये प्राणिक ऊर्मी मिसळलेली असते तेव्हा ती प्राणिक इच्छा बनते. पण ती आस जर स्थिरशांत, खोलवरची असेल; त्यामध्ये जर कोणताही कोलाहल नसेल, आग्रह नसेल तर ती चैत्य पुरुषाची अभीप्सा असते.

ज्यांना अगदी सुरुवातीपासूनच येथे बोलवण्यात आले आहे, किंवा ज्यांची तयारी झालेली आहे, किंवा ज्यांना कोणत्या ना कोणत्या तरी कारणासाठी योगसाधनेद्वारे तयार करण्यात येणाऱ्या या निर्मितीचा किंवा कार्याचा एक भाग बनण्याची संधी देण्यात आलेली आहे अशा व्यक्तींनी येथे राहणेच आवश्यक आहे. त्यांच्यासाठी या वातावरणातील वास्तव्य, सान्निध्य अपरिहार्य आहे. अशा परिस्थितीत त्यांनी आश्रमापासून दूर जाणे म्हणजे त्यांना मिळालेली संधी त्यांनी दवडली किंवा आध्यात्मिक भाग्याकडे त्यांनी पाठ फिरवली असा त्याचा अर्थ होईल.

वरकरणी पाहता, बाहेर राहून जे साधना करतात त्यांच्यापेक्षा येथे राहून साधना करणाऱ्यांना अधिक आव्हांनाना सामोरे जावे लागते असे दिसते. कारण येथील दबाव आणि अपेक्षा जास्त असतात. तथापि त्यांना मिळणारी संधीदेखील मोठी असते. आणि त्यांच्या प्रगतीसाठी शक्तीचा व प्रभावाचा जो वर्षाव त्यांच्यावर करण्यात येतो त्याचे प्रमाणही अधिक असते. त्यांना आलेली साद व त्यांनी केलेली निवड यांच्याशी जर ते एकनिष्ठ राहिले तर आध्यात्मिकदृष्ट्या जे बनण्याची शक्यता त्यांच्यामध्ये असते त्यासाठी आवश्यक असणारी क्षमताही त्यांना प्रदान करण्यात येते.

– श्रीअरविंद (CWSA 35 : 574-576)

**

नमस्कार वाचकहो,

अभीप्सा मासिकातील काही पाने आपल्या अवलोकनार्थ येथे देण्यात आली होती. आपल्याला ह्या अंकातील विषयावरील आणि यासारख्या इतर विषयांवरील श्रीअरविंद आणि श्रीमाताजी यांचे विचार मराठीत समजून घ्यावयाचे असतील तर, आपण अभीप्सा मासिकाचे वर्गणीदार व्हावे, ही विनंती.

वर्गणीचा तपशील शेजारील पानावर दिला आहे.

– संपादक, अभीप्सा मासिक

## मासिकाचे स्वरूप

श्रीअरविंदांचे बहुतांशी सारे साहित्य मुळात इंग्रजी व बंगाली भाषेत आहे. तर श्रीमाताजी यांचे बहुतांशी वाङ्मय फ्रेंच व इंग्रजी भाषेत आहे. हे दुर्मिळ विचारधन मराठीत आणण्याचे प्रयत्न ’अभीप्सा’ या मासिकाच्या माध्यमातून अव्याहतपणे चालू आहेत. पाँडिचेरीहून प्रकाशित होणाऱ्या श्रीअरविंद सोसायटीचे मुखपत्र असलेल्या ‘ऑल इंडिया मॅगेझिन’ या इंग्रजी मासिकाची मराठी आवृत्ती म्हणजे ‘अभीप्सा.’ १९७५ पासून हे मासिक नियमितपणे प्रकाशित होत आहे.

### वर्गणी व देणगीचा तपशील

वार्षिक वर्गणी : २०० रू. (१२ अंक)

तीन वर्षाचे दर : ५८० रू. (३६ अंक)

पाच वर्षांचे दर : ९६० रू. (६० अंक)

देणगीदार : ४००० रू.

(देणग्या 80 G अंतर्गत करसवलतीस पात्र आहेत.)

वर्गणी वा देणगीची रक्कम आपण ऑनलाईनदेखील भरू शकता.

### वर्गणी वा देणगी ऑनलाईन भरण्यासाठी बँकेचा तपशील

खातेदाराचे नाव : Sri Aurobindo Society

बँकेचे नाव : Central Bank of India, Pondicherry Branch
IFSC Code : CBIN0281354

A/C No. : 1235467709

*

**सूचना :** रक्कम भरल्याची पोहोचपावती व आपला संपूर्ण पत्ता membership@aurosociety.org आणि editorabhipsa2018@gmail.com या ईमेल आयडीवर पाठवावा ही विनंती; म्हणजे आपल्या पत्त्यावर अंक पाठवता येईल.

*

वर्गणीदारांना काही कारणाने अंक उपलब्ध न झाल्यास पुढील क्रमांकावर संपर्क करावा – श्री. गोविंद पोतदार ९३७३७२४५२०

## आजवर दर्शनदिनी देण्यात आलेले संदेश (क्रमशः)

### १७ नोव्हेंबर २०१०

तुम्हाला जर कधी अतोनात दुःख, चटका लावून जाणारी आशंका किंवा असह्य पीडा भेडसावू लागली आणि परिणामतः त्यातून तुम्हाला जर नैराश्य जाणवू लागले तर, पुन्हा स्थिरचित्तता आणि शांती मिळविण्याचा एक अचूक मार्ग आहे. तो पुढीलप्रमाणे आहे.

आपल्या अंतरंगामध्ये खोलवर एक असा प्रकाश उजळलेला असतो की, त्याच्या तेजाची तुलना फक्त त्याच्या विशुद्धतेबरोबरच होऊ शकते. तो प्रकाश म्हणजे विश्वात्मक परमदेवतेचा एक चैतन्यमय, सचेत असा अंश असतो. तो जडसृष्टीला चैतन्य प्रदान करतो, तिचे पोषण करतो आणि तिला प्रकाशित करतो. जे कोणी त्याच्या कायद्याचे पालन करू इच्छितात त्यांच्यासाठी तो एक अतिशय शक्तिशाली आणि अचूक मार्गदर्शक असतो; जे त्याचे दर्शन घेण्याची, त्याची वाणी कानावर पडण्याची आणि त्याच्या आदेशाचे पालन करण्याची आस बाळगतात, त्यांच्यासाठी तो सांत्वन करणारा, प्रेमळ क्षमाशील साहाय्यक असतो.

त्याच्याबद्दल बाळगलेली कोणतीही प्रामाणिक व सातत्यपूर्ण अभीप्सा कधीही व्यर्थ जात नाही, त्याच्यावर ठेवलेल्या गाढ आणि आदरयुक्त विश्वासाला आजवर कधीही तडा गेलेला नाही किंवा त्याच्याकडून बाळगलेल्या अपेक्षेचा आजवर कधीही भंग झालेला नाही.

– श्रीमाताजी (CWM 02 : 20)

# जणू वेदकाळच अवतरला आहे...

वेदमूर्ती महामहोपाध्याय पंडित श्रीपाद दामोदर सातवळेकर हे त्यांच्या वेदाध्ययनासाठी सर्वपरिचित होते. वेदांवर त्यांचे तीस खंड प्रकाशित झाले आहेत. श्रीअरविंद-आश्रमातील त्यांच्या मुक्कामात त्यांनी श्रीमाताजींसमवेत जेव्हा ध्यान केले तेव्हा त्यांना अंतरंगामध्ये एकामागून एक सात ते आठ दालने खुली होत असलेली दिसली. ते पांढऱ्याशुभ्र प्रकाशात न्हाऊन निघाले आहेत, असेही त्यांना जाणवले. त्यांच्या संपूर्ण वास्तव्यात त्यांना पदोपदी श्रीमाताजींच्या उपस्थितीची जाणीव होत होती.

या वास्तव्यामध्ये त्यांना श्रीअरविंद-आश्रमाचा जो अनुभव आला तो त्यांनी शब्दबद्ध केला आहे. ते लिहितात की, ''गेली पन्नास ते साठ वर्षे मी जे स्वप्न उराशी बाळगून होतो ते मला येथे प्रत्यक्ष साकारलेले दिसत आहे. किंबहुना वेदकाळानंतर अशा प्रकारचा प्रयत्न प्रथमच होताना दिसत आहे. येथील सर्व साधना-प्रक्रिया ही वेदांतील तत्त्वांवर आधारित आहे. वेदांमध्ये ज्या गोष्टींचा केवळ निर्देश करण्यात आला होता त्या सर्व गोष्टी येथे कोणत्या ना कोणत्या प्रकारे पूर्णत्वाला जाताना दिसत आहेत.

येथे कोठेही जातीपातीचा मागमूसदेखील दिसत नाही. वेदकाळाप्रमाणेच येथे स्त्रीपुरुष भेदभावसुद्धा कोठे दिसत नाही. आश्रमामध्ये, शाळेमध्ये, मैदानावर तरुण मुलेमुली मोकळेपणाने वावरताना दिसत आहेत. मला वाटते की श्रीमाताजी एका विशुद्ध आध्यात्मिक समाजाची घडण करू पाहत आहेत.''

श्रीअरविंद-आश्रमातील एका विभागाचे नाव प्रॉस्पेरिटी (समृद्धी) असे आहे आणि तेथे आश्रमवासीयांना जीवनावश्यक सर्व गोष्टी पुरवल्या जातात, हे पाहून पंडित सातवळेकर थक्क झाले. येथे सर्वसंगपरित्यागावर भर नसून समृद्धीवर भर आहे, ही गोष्टदेखील वेदकाळाशी मिळतीजुळती आहे, हे त्यांच्या लक्षात आले. येथे कोणत्याही गोष्टीला विरोध नाही, तर प्रत्येक गोष्टीला तिचे यथोचित स्थान देण्यात आले आहे, हे पाहून तर, 'इथे जणू काही वेदकाळच पुन्हा अवतरला आहे,' असे त्यांना वाटून गेले.

(श्री. नारायण प्रसाद लिखित पुस्तकामधून.)

*